## पोलीस स्मृतिदिन दिनांक - २१/१०/२०२३

## पोलीस स्मृतिदिन संचलन २१ ऑक्टोबर २०२३ शोक कवायत

मागील एका वर्षाचे कालावधीत ज्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावत असताना, वीरमरण आले, अशा संपुर्ण भारत देशातील सर्व राज्यामधील पोलीस अधिकारी व अंमलदार / जवान यांचे स्मृतिला आज दि.२१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ०७/३० वा.ते ०९/०० वा.चे दरम्यान पाषाण रोड स्थित महाराष्ट्र राज्य पोलीस संशोधन केंद्र,(सीपीआर),पुणे येथील पोलीस हुतात्मा स्मृतिस्थळावर पोलीस दलाच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. २१ ऑक्टोबर हा दिवस देशातील विविध पोलीस दलाचे वतीने पोलीस स्मृतिदिन म्हणुन पाळला जातो.

लडाख येथे दि.२१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉटस्प्रिंग या कडाक्याच्या थंडीच्या ठिकाणी, सुसज्ज चिनी सैन्याने केंद्रीय निमलष्करी पोलीस दलाच्या १० शुर शिपायांच्या तुकडीवर पुर्व तयारी निशी अचानक हल्ला केला. त्यावेळी त्या १० शुर वीरांनी शत्रुशी निकराने लढत देऊन देशासाठी आपले देह धारातिर्थी ठेवले. तेव्हापासुन २१ ऑक्टोबर हा दिवस देशातील विविध पोलीस दलाचे वतीने पोलीस स्मृतीदिन म्हणुन पाळला जातो. पोलीस स्मृतीदिनाचे दिवशी एकाच वेळी देशातील सर्व पोलीस मुख्यालयाचे ठिकाणी मागील एका वर्षाचे कालावधीत ज्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले,त्या सर्वांना आदरांजली वाहण्यात येते.

आज २१ ऑक्टोबर २०२३ रोजी पुणे येथे महाराष्ट्र राज्य पोलीस संशोधन केंद्र,(सीपीआर),पुणे येथील पोलीस हुतात्मा स्मृति स्मारकावर सकाळी ०८/०० वा. **मा.वाइस एडमिरल,(अजय कोच्छर),ए. व्हि.एस.एम,एन.एम.कमांडट,नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी,खडकवासला,पुणे** तसेच मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस आयुक्त,पिंपरी-चिंचवड,पुणे,श्री.विनयकुमार चौबे, मा.कारागृह पोलीस महासंचालक,म.राज्य,श्री.अमिताभ गुप्ता, मा. पोलीस महासंचालक,बिनतारी संदेश विभाग पुणे, श्री.सुनिल रामानंद, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र इंटेलिजन्स अॅकेडमी,पुणे,श्री.राजेंद्र डहाळे, मा.पोलीस महानिरीक्षक कारागृह, पुणे,श्री.जालींदर सुपेकर, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुंमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन),पुणे,श्री.अरविंद चावरिया, मा.अपर पोलीस आयुक्त,पिंपरी-चिंचवड,पुणे,श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस सह आयुक्त, पिंपरी-चिंचवड,श्री.संजय शिंदे, मा.पोलीस महानिरीक्षक,एसआरपी,श्री.अशोक मोराळे, मा.पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,श्री.अंकीत गोयल, मा.पोलीस अधिक्षक,पुणे,राज्य गुन्हे अन्वेषण विभाग,श्री.पंकज देशमुख व पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी (तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी श्री.प्रविण दिक्षीत, श्री.राजेंद्र सिंग व श्री.भगवंतराव मोरे, श्री.कृष्णन, श्री.मकरंद रानडे, श्री.विजयसिंग जाधव, श्री.रामराव वाघ, श्री.प्रभाकर ढमाले, श्री.राम मांडुरके,श्री.शेषराव सुर्यवंशी असे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.)

मा.वाइस एडमिरल,(अजय कोच्छर),ए.व्हि.एस.एम,एन.एम.कमाडंट,नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी, खडकवासला,पुणे, मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.कारागृह पोलीस महासंचालक,म. राज्य,श्री.अमिताभ गुप्ता, मा.पोलीस महासंचालक,बिनतारी संदेश विभाग पुणे,श्री.सुनिल रामानंद व सेवानिवृत्त पोलीस महासंचालक,श्री.प्रविण दिक्षीत, श्री.राजेंद्र सिंग व अति.पोलीस महासंचालक,श्री. भगवंतराव मोरे यांनी पुष्पचक्र अर्पण केले आहे.

**दि.१ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीत महाराष्ट्रातील १.सहा.पो.निरी. सुदर्शन भिकाजी दातिर २.पो.हवा.गौरव नथुजी खरवडे ३.पो.हवा.जयंत विष्णुजी शेरेकर ४.पो.हवा. विठ्ठल एकनाथ बदने ५.पो.ना.संजय रंगराव नेटके ६.पो.ना.अजय बाजीराव चौधरी अशा एकुण ०६ असे पोलीस जवान कर्तव्यावर असताना शहिद झाले.**

या प्रसंगी शोक कवायतीचे आयोजन करण्यात आले होते. शोक कवातीसाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालया कडील एक प्लाटुन, पुणे ग्रामीणकडील एक प्लाटुन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालया कडील एक प्लाटुन,पुणे लोहमार्ग पोलीसकडील एक प्लाटुन व राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ व २ यांचेकडील प्रत्येकी एक प्लाटुन अशा एकुण ०६ प्लाटुन मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तसेच बॅण्ड पथका मध्ये पुणे शहर,पुणे ग्रामीण यांचे कडील वाद्य-वृंदयांनी भाग घेतला होता. परेड कमांडर,श्री.दशरथ हटकर,राखीव पोलीस निरीक्षक,मुख्यालय,पुणे शहर व सेकंड परेड कमांडर,श्री. विठ्ठल मांढरे,राखीव पोलीस उप-निरीक्षक,मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे यांनी परेड कवायतीचे नेतृत्व केले. पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पुणे ग्रामीण, बिनतारी संदेश विभाग,गुन्हे अन्वेषण विभाग, मोटार परिवहन विभाग,पुणे,विविध शाखा या विभागातील वरिष्ठ पोलीस अधिकारी व अंमलदार,पोलीस दवाखाना वैद्यकीय स्टाफ यांचेसह एकुण ४६३ हजर होते.

दि.१ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीत आपले कर्तव्य बजावित असताना, वीरगती प्राप्त झालेल्या देशातील पोलीस अधिकारी व पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण १८८ जवानांच्या नावाच्या यादीचे वाचन शोक कवायतीचे दरम्यान श्रीमती.आरती बनसोडे,सहा.पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे व श्रीमती.नंदिनी वाग्यानी,सहा.पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर यांनी केले.

सदर कार्यक्रमाचे सुत्र-संचालन श्री.सिताराम नरके,सेवानिवृत्त,सहा.पो.फौज.एसआरपीएफ,ग्रुप, रामटेकडी,पुणे व दत्तात्रय निकम,पोलीस अंमलदार,पिंपरी पो स्टे यांनी केले.